# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/०९/१७
## दि.२०/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३५६/१७,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | श्रध्दा गाढे,वय-२५,रा.शाहु कॉलनी,कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | १.चेतन सागर कानकेकर व इतर दोन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे फेब्रुवारी २०१७ ते ऑगस्ट २०१७ रोजीचे कालावधीत मोबाईल व ई-मेलवरून |
| **तपशिल** | यातील नमुद इसम चेतन कानकेकर याने फिर्यादी यांना माहे फेब्रुवारी २०१७ ते ऑगस्ट २०१७ रोजीचे कालावधीत मोबाईल व ई-मेलवरून संपर्क करून त्यांना नामांकीत खाजगी कंपनी मध्ये सॉफ्टवेअर इंजिनीअर या पदावर नोकरी लावण्याचे अमिष दाखवुन,फिर्यादी व त्यांचे इतर तीन मित्रांकडुन एकुण २ लाख रुपये घेऊन,फिर्यादी व इतर साक्षीदारांना नोकरी न लावता त्यांची फसवणुक केली आहे. (फिर्यादी यांची फसवणुक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी. खांडेकर ७८८८०४२९११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४६६/१७,भादविक ४२०,४०६,४०९,३४ |
| **फिर्यादी** | अमित कुलकर्णी,वय-४१,रा.रुतुरंग सोसा.सहकारनगर,पुणे |
| **आरोपी** | १.हर्षल अरुण खेडले,वय-३१,रा.गजराज सोसा.नवी पेठ,पुणे (अटक) व इतर ११ |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जानेवारी २०१५ ते जुन २०१७ रोजीचे कालावधीत ॲटोमॅटीक आयटी सर्व्हिस प्रा.लिमी. आणि ॲटोमेटीक सॉफ्टवेअर सर्व्हिस प्रा.लिमी.बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हर्षल अरूण खेडले हा ॲटोमॅटीक आयटी सर्व्हिस प्रा.लिमी. आणि ॲटोमेटीक सॉफ्टवेअर सर्व्हिस प्रा.लिमी.बिबवेवाडी,पुणे याठिकाणी अकाऊंटंट म्हणुन नोकरी करीत असताना,सदर इसमाने त्याचे इतर साथीदारांसह संगनमत करुन,कंपनीच्या खाजगी बँकेचे चेकद्वारे ८४,६०,३७२/- रुपये रक्कम स्वतःचे खात्यामध्ये जमा करुन कंपनीची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गायकवाड ९८२३७ ११७१८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ५४०/१७,भादविक ४२०,४०६,५०६ |
| **फिर्यादी** | मुक्ताबाई काळे,वय-४० वर्षे,रा.नढेनगर काळेवाडी,पुणे |
| **आरोपी** | दिनेश किशनचंद नानकानी,वय-४५ वर्षे,रा.नटराज मार्केट साई चौक,पिपंरी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०३/२०१७ ते दि.२५/०७/२०१७ रोजीपर्यत चॉईस गारमेंट दुसरा मजला नटराज मार्केट,साई चौक,पिपंरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे नातेवाईकाचे एम.टेक व बी.बी.ए. या प्रवेशासाठी एकुण ८,१७,०००/- रुपये यातील नमुद इसम दिनेश किशनचंद नानकानी याचेकडे विश्वासाने दिलेले असताना,त्याने ती रक्कम स्वतःच्या फायद्याकरीता वापरुन,सदर रकमेचा अपहार करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मुंढे ८८८८८२४१७६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३८५/१७,भादविक ३८५,५००,५०६,३४,महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासुन व्यक्तीचे संरक्षण प्रति.अधि.२०१६ चे क.३(८)(१५)५ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३७,रा.महात्मा फुले पेठ,पुणे |
| **आरोपी** | १.पद्मशाली समाजाचे पंच कमिटीचे विद्यमान सरपंच- सोमनाथ कैची,रा.गुरूवार पेठ,पुणे २. विश्वस्त-महादेव काडगी,रा.धनकवडी,पुणे ३.अध्यक्ष-दिलीप जाना,रा.कोंढवा,पुणे ४.उपाध्यक्ष-विनायक साका,रा.३०१,महात्मा फुले पेठ,पुणे ५.सदस्य-विनोद जालगी,रा.धनकवडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१६ ते दि.१४/०५/१७ रोजी १३/०४ वा.चे दरम्यान पद्मशाली भवन,३४०,गंज पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पद्मशाली समाजाचे पद्मशाली पंच कमिटी विश्वस्त संथेचे ३५०, महात्मा फुले,गंज पेठ,पुणे येथील मिळकती मध्ये अंदाजे २५० स्कवेअर फुटाचे सुरेंद्र जनरल स्टोअर्स नावाचे दुकान असुन,सदर दुकानाची भाडे पावती हि फिर्यादी यांचे आजोबा कै. काशीनाथ नारायण दासा यांचे नावावर असुन,सदरची भाडेपावती ही फिर्यादी यांचे नांवे करणेबाबत फिर्यादी यांचे वडील व फिर्यादी यांनी वेळोवेळी संस्थेला विनंती अर्ज केला असता,यातील अ.क्र.१ व ३ यांनी फिर्यादी यांना भाडेपावती नावावर करण्याकरीता ५ लाख रूपये व भाडेपावती दरमहा १५ हजार रूची मागणी केली असता, फिर्यादी यांनी त्यास नकार देताच, सदर इसमांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांना धमकी देऊन सदर मिळकती मधुन बेदखल करण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादी यांनी सदर बाबत पुर्वी पोलीसांकडे तक्रार केली होती. त्यावेळी त्यांचे समाजाचे सरपंच यांना पोलीसांनी बोलविल्याचे कारणा वरुन त्याचे इतर साथीदारांचे सांगण्यावरुन फिर्यादी यांनी सरपंचाची माफी मागितली नाही या कारणावरून फिर्यादी यांना टिळा लावु नका,त्यांना समाजामधुन बाहेर काढा अशी चेतावणी देऊन फिर्यादी यांचे बाबत बदनामीकारक संदेश व्हॉटसअप पाठवुन समाजात बदनामी केली आहे. (सदरचा गुन्हा पी.पी.ओ.पी.एन.ला पाठवला असल्या कारणाने उशीरा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पवार ९४०५५८७००२ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ३७८/१७,भादविक ३८०,१८२,२११,५०५(१)(ब) |
| **फिर्यादी** | अमित शेटे, पो.उप.निरी. सांगवी पो स्टे |
| **आरोपी** | प्रसाद उर्फ लल्या दिपक पाटील,वय-२२,रा.जनार्दन जगताप चाळ,पिंपळे-गुरव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०९/१७ रोजी रात्रौ ००/३० वा. आवरादे सोमनाथ प्रकाश यांचे मंडप सामानाचे गोडावुन एक्सेल एनक्लेव्ह बिल्डींगचे पाठीमागे काशीद पार्क,पिंपळे-गुरव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम प्रसाद उर्फ लल्या दिपक पाटील,वय-२२,रा.जनार्दन जगताप चाळ,पिंपळे-गुरव,पुणे याने हनुमान कलगाने राहत असलेल्या उघडया गोडावुन मध्ये प्रवेश करून हनुमान कलगाने याचा मोबाईल चोरी करून,सदर मोबाईलचा वापर करून पोलीसांना जाणीव पुर्वकरित्या खोटी माहिती पुरवुन पोलीस विभागाला वेठीस धरले. तसेच पोलीसांचे अधिकाराचा मोबाईलधारक इसमास त्रास होवुन त्याचे नुकसान होण्याचे तसेच कॉल पॉईंट भागात गोळीबार / फायरिग झाली आहे अशी अफवा पसरवुन सदर भागातील सामान्य नागरीकां मध्ये भिती व भयग्रस्तता निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बलभिम ननवरे ८२७५४६२४९५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**